# महाराष्ट्र शासन
# शासकीय मुद्रणालय, वाई ,
# ५१ गंगापुरी, रास्तेवाडा, वाई - ४१२ ८०३
# जाहिरात क्रमांक १ /२०१३

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दिनांक २५-७-२०१२ व समक्रमांकाचे दिनांक २८-२-२०१३ अन्वये रिक्त पदे भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय /खुला प्रवर्गातील इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

**सरळसेवेची घोषित पदे**

| अ.क्र | पदाचे नाव | एकूण पदे | समांतर आरक्षण | अनुसूचित जाती | अनसूचित जमाती | वि.जा.अ | भ. ज. ब | भ ज.क | भ. ज.ड | वि मा. प्र. | इ. मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिपिक-टंकलेखक वे.बॅ.रु.५२००-२०२०० ग्रे.वे.१९००/- | १ | सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | - |
| २. | परिचर प्रतिरुप वे.बॅ.रु.५२००-२०२०० ग्रे.वे.१९००/- | ३ | सर्वसाधारण | - | १ | १ | - | - | - | - | - | १ |
| ३. | बांधणी सहाय्यकारी वे.बॅ.रु.५२००-२०२०० ग्रे.वे.१८००/- | ३ | सर्वसाधारण | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ४. | प्रक्रिया सहाय्यक वे.बॅ.रु.५२००-२०२०० ग्रे.वे.१९००/- | १ | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ |

**२. शैक्षणिक अर्हता/अनुभव** (अर्ज करतेवेळी उमेदवारांने पदनिहाय अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

१. **लिपिक-टंकलेखक :-** माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण किंवा तत्सम अर्हता, मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र म्हणजे संचालक, (परिक्षा) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांनी दिलेले टंकलेखनाचे प्रमाणपत्र आणि शासनाने या उद्देशासाठी ज्या समकक्ष म्हणून घोषीत केले आहे, असे अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले प्रमाणत्र, MS-CIT परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

२. **परिचर प्रतिरुप :-** इयत्ता ९ वी उत्तीर्ण, कागदी रिमे, यंत्राचे फॉर्मस, छापील कामे हलविणे या सारखी जड कामे करण्याकरिता धडधाकट शरीरयष्टी असणे आवश्यक, प्लेट्स लावणे, काढणे, स्वच्छ करणे, फिडर भरणे इत्यादी कामांची सर्वसाधारण माहिती असणे आवश्यक, रोलर स्वच्छ करणे, शाई साफ करणे, प्लेट धुणे इत्यादी बाबींची माहिती. कोणत्याही मुद्रणालयातील किमान तीन वर्षांचा अनुभव, शिकाऊ उमेदवारी केलेल्या उमेदवारास प्राधान्य.

३. **बांधणी सहाय्यकारी :-** इयत्ता ९ वी उत्तीर्ण, बांधणी विभागातील अवजड कामे करणे, योग्य मजबूत शरीरयष्टी आवश्यक, फोल्डींग, गॅदरींग, कोलॅटिंग,रॅपिंग व पाकिटे तयार करण्यासह बांधणी विभागातील इतर सर्व प्रक्रियांचा अनुभव असणे आवश्यक, नावाजलेल्या प्रिंटींग प्रेसमधील किमान तीन वर्षे काम केल्याचा अनुभव. बांधणी विभागातील शिकाऊ उमेदवारी कोर्स केलेल्या उमेदवारांस प्राधान्य.

४. **प्रक्रिया सहाय्यक :-** इयत्ता ९ वी उत्तीर्ण, प्लेट मेकींगच्या वेगवेगळ्या प्लेटची माहिती, अलबुमन,डिपटच, बिमेटेलिक इत्यादीचे ज्ञान, निगेटीव्ह व पॉझिटीव्ह कामाची माहिती तसेच रसायनांची व साहित्याची माहिती, लाईन व हाफटोन करीता प्रथमदर्शनी कामाची माहिती, वजनी काम करण्याकरिता शारिरीक दृष्टया सक्षम पात्रता, लाईन व हाफटोन वरील प्रिंटींग डावून फिल्मची माहिती.

## ३. वयोमर्यादा :-

३.१. उमेदवाराचे वय दिनांक ०१/१२/२०१३ रोजी १८ वर्षे पूर्ण, खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे असे राहील.

३.२. माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकामधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड कालावधी अधिक तीन वर्ष एवढा कालावधी त्यांचा विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

३.३. (१) स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य (२) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी (३) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी (४) शासकीय सेवेतील कर्मचारी (५) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त उमेदवार (६) अंपग उमेदवार इत्यादींसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

३.४. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षांकरीता शिथिल करता येईल.

३.५. अंशकालीन कर्मचारी उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

**टीप :-**

१. भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

२. पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार (अध्यक्ष गट क निवड समिती) यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

३. सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना/निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बदल झाल्यास त्या-त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती सर्वांवर बंधनकारक राहील.

४. उमेदवारांची लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक तथा मुलाखतीचे ठिकाण निश्चीत झाल्यानंतर ते प्रवेशपत्राव्दारे कळविण्यात येईल.

५. भरती प्रक्रिया/जाहिराती संदर्भात काही बदल किंवा शुध्दिपत्रक काढणे.इ.बाबतचे अंतिम निर्णय सदस्य सचिव तथा व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई यांचे राहतील याबाबत उमेदवारांना प्रसिध्दी माध्यमाव्दारे व शासनाच्या संकेतस्थळाव्दारे प्रसिध्द केले जातील

**(यापूर्वी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमध्ये टिप ४ खाली टिप ५ ही सुधारणा करण्यात आलेली आहे याची नोंद ध्यावी )**

**४. अर्ज करावयाची पध्दत :-**

४.१. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज अे-४ आकारात पांढ-या जाड कागदावर सादर करावा. त्यावर पासपोर्ट आकाराच्या अलिकडच्या काळातील स्वत:चा फोटो स्वत:ची स्वाक्षरी करून अर्जावर चिकटवावा. टपालाने अर्ज पाठविताना भारतीय टपाल सेवेमार्फत पाठवावा. अर्ज बंद केल्यावर लिफाफ्यावर स्वत:चे पूर्ण नाव अर्ज केलेल्या पदाचे नाव ठळक अक्षरात लिहून रेखांकित करावे.

४.२. भरलेला अर्ज **व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, ५१ गंगापूरी रास्तेवाडा वाई जिल्हा सातारा वाई - ४१२ ८०३** या पत्त्यावर दिलेल्या अंतिम तारीख व वेळेच्या आत पोहचतील या बेताने डाकेने पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत हस्तपोच जमा करावेत.

४.३. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख **२८/११/२०१३** असून त्यादिवशी सायंकाळी **५.३०** पर्यंत अर्ज स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पोष्टाने झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही व त्यासंबंधी कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदरचे अर्ज अपात्र ठरविले जातील.

४.४. उमेदवाराने विहित नमुन्यामधील अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. जी बाब अर्जदारास लागू होत नसेल तेथे लागू नाही असे नमूद करावे. अर्जदाराने त्याचा प्रवर्ग न चुकता नमुद करावा. अर्जदाराने अर्जात जो प्रवर्ग नमूद केला असेल त्याच प्रवर्गाकरता अर्जदाराचा विचार करणेत येईल.

**५. अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

उमेदवाराने अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (Attested) जोडणे आवश्यक आहे. केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक तसेच विशेष प्राधिकृत प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या दाखल्याच्या सत्य प्रती ग्राह्य धरल्या जातील. मुळ प्रमाणपत्रे अथवा गुणपत्रके अर्जासोबत जोडू नयेत.

५.१. शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/गुणपत्रके.

५.२. जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला/शालांत परीक्षा प्रमाणपत्र.

५.३. आरक्षित मागासप्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

५.४. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब,दिनांक १२-१२-२०११ मधील तरतूदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचीकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

५.५. वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र. व इमाव या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या उमेदवारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांने दिलेले दिनांक ३१-०३-२०१३ अखेर वैध असलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबंधित आरक्षणाचा लाभ दिला जाईल, अन्यथा दिला जाणार नाही. तसेच, खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१.३.२०१३ नंतरचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

५.६. शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७ जून २०११ नुसार ज्या परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

५.७. परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतू सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परीक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही.

५.८. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परीक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

५.९. अनुभवाचे प्रमाणपत्र.

५.१०. अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना तासिका, नियतकालिक, अंशकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी ग्राह्य धरला जाणार नाही. पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसाह्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहीजे. निवड झालेल्या अंशकालीक कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केल्याचे पुरावे कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करावे लागतील.

५.११. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

५.१२. अपंग प्रवर्गातील उमेदवाराने सवलतीच्या लाभासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असल्या बाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे व त्यावर उमेदवाराचा फोटो असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.१३. अर्जासोबत जाहिरातीत दर्शविण्यात आल्याप्रमाणे आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क अर्जाच्या डाव्या बाजूला चिकटवावे.

**६. इतर महत्वाच्या सूचना :-**

६.१. सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८-०३-२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१-०७-२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि.२८-०३-२००५ नुसार रोजी हयात असलेल्या व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या याबाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र, सादर करणे आवश्यक आहे. तसेच, अविवाहित असणा-या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.२. उमेदवारांना लेखी परिक्षेस तसेच मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

६.३. लेखी परीक्षेमध्ये फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

६.४. उमेदवाराने लेखी परीक्षेत एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

६.५. निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

६.६. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.

६.७. शासन निर्णय वित्त विभाग अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

६.८. भरती प्रक्रियेदरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील व भा.दं.वि. संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

६.९. जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही किमान अर्हता आहे. ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरू शकणार नाही.

६.१०. निवड झालेले उमेदवार सेवेत रूजू झाल्यानंतर त्यांना मूळ वेतनाव्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते शासकीय नियमाप्रमाणे मिळतील.

६.११. नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचा परिविक्षाधिन कालावधी सहा महिन्याचा असेल या कालावधीत त्यांचे काम, वर्तणूक व उपस्थिती समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६.१२. नियुक्त झालेल्या उमेदवारास कार्यालयाच्या आस्थापनेवर कोणत्याही पाळी (SHIFT) मध्ये काम करावे लागेल.

६.१३. जाहिरातीतील पदांच्या भरती प्रक्रियेबाबत प्रशासनाचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तीक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

६.१४. उमेदवाराने अर्जावर चिकटवलेल्या फोटो व्यतिरिक्त अर्जा सोबत स्वतःचा पासपोर्ट आकाराचा एक फोटो अर्जास स्टेपल करून जोडणे आवश्यक आहे. त्या फोटोच्या मागे उमेदवाराने नाव पत्ता नमूद करून स्वाक्षरी करावी. तसेच उमेदवाराने अर्जासोबत स्वतःचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह लिहिलेला व रु.५ /- चे तिकीट लावलेला पोस्टाचा लिफाफा पाठवावा.

६.१५. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलवण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही याची नोंद घ्यावी.

६.१६. सदर जाहिरात ही www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

६.१७.अपंग संवर्गासाठी पात्र उमेदवारास नियुक्ती पूर्वी वैद्यकीय मंडळाने पदाचे कर्तव्य करण्यास सक्षम ठरविल्यास नियुक्ती करण्यात येईल.

६.१८. अपंग उमेदवारांना लेखनिक आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची शैक्षणिक पात्रता, पदास आवश्यक शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावी. तसेच लेखनिक आवश्यक असल्याबाबतची लेखनिकाची शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, ओळखपत्र इ. बाबतच्या तपशिलासह लेखी स्वरूपात स्वतंत्र देणे बंधनकारक राहील. ऐनवेळी लेखनिकाची परवानगी देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

६.१९. शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावेत. सदर परवानगी अर्ज सादर करण्यापुर्वीची असणे आवश्यक आहे.

६.२०. माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/ हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/ हिंदी भाषा परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६.२१.सर्व संवर्गातील नियुक्त उमेदवारांना नियुक्तीनंतर शासनाने विहित केलेल्या निर्णयानुसार खात्यातंर्गत परीक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

**७. परीक्षेचे स्वरूप**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३/-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ नुसार खालील पदांसाठी घेण्यात येणारी लेखी परिक्षा/व्यावसायीक चाचणी/ मुलाखतीचे गुण खालीलप्रमाणे राहील. (ज्या पदासाठी लेखी/व्यावसायीक/मुलाखत घेण्यात येणार आहे त्या त्या रकान्यात सदर पदाचे गुण दर्शविण्यात आले आहे.)

| अ.क्र. | पदनाम | लेखी परिक्षेचे गुण | व्यवसायिक चाचणी गुण | मुलाखती गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिपिक-टंकलेखक | २०० | -- | -- | २०० |
| २ | परिचर प्रतिरुप | -- | ९० | १० | १०० |
| ३ | बांधणी सहाय्यकारी | -- | ९० | १० | १०० |
| ४ | प्रक्रिया सहाय्यक | -- | ९० | १० | १०० |

**टिप :-**

७.१ ज्या पदाकरिता कमीतकमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे, अशा पदांकरिता लेखी परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी सामान्यज्ञान व गणित या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील.

७.२. एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७-०६-२००८ मधील निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

७.३. वरील दि.१९-१०-२००७ च्या शासन निर्णयात निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार वर नमूद केलेल्या संवर्गातील भरावयाच्या पदांबाबतीत लेखी परिक्षेतील गुण विचारात घेवून पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी/मौखिक परीक्षेसाठी बोलविण्यात येईल.

७.४. लेखी परीक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या नमूद केल्याप्रमाणे राहील.

| <u>रिक्त पदांची संख्या</u> | <u>मुलाखतीसाठी बोलविण्याच्या उमेदवारांची संख्या</u> |
|---|---|
| ५ पदांपर्यंत | रिक्त पदांच्या संख्येच्या पटीत मात्र उमेदवारांच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादित_____ |

७.५. वर नमूद केलेल्या पदांसाठी असलेल्या मौखिक परीक्षेस उमेदवार गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.

**८) परीक्षा शुल्क :-**

८.१. सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार असून, सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

८.२. उमेदवारांकडून अर्जासोबत पुढीलप्रमाणे परीक्षा शुल्क महाराष्ट्र राज्याचे न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरूपात (कोर्ट फी स्टॅम्प) आकारण्यात येतील.

| | | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | रू.१५०/- | रु.७५/- |
| २) | लेखी परीक्षा/व्यावसायिक चाचणी परीक्षा व मुलाखत | रू.२००/- | रू.१००/- |
| ३) | माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही. | | |

क्वचित प्रसंगी अर्जदाराला न्यायालय फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प) मिळविणे शक्य नसेल तर त्याबाबतीत रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे आवेदन शुल्क स्वीकारण्यात येईल.

**९) खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. :-**

९.१. विहित नमुन्यातील नसलेले अर्ज.

९.२. फोटोवर स्वाक्षरी नसलेले व अर्जावर उमेदवारांची स्वाक्षरी नसलेले अर्ज.

९.३. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.

९.४. विहित पात्रता पूर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

९.५. मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज.

९.६. आवश्यक प्रमापत्राच्या प्रमाणित सत्यप्रती न जोडलेले अर्ज.

९.७. विहित केलेप्रमाणे परीक्षा शुल्क न भरलेले व जोडलेले अर्ज.

सदस्य सचिव,
प्रादेशीक निवड समिती तथा व्यवस्थापक
शासकीय मुद्रणालय, वाई

# <u>अर्जाचा नमुना</u>

प्रति,

| |
|---|
| अर्जदाराचा पासपोर्ट<br>आकाराचा अलिकडच्या<br>काळातील काढलेला<br>स्वत:चा फोटो<br>--------------------<br>अर्जदाराची स्वाक्षरी |

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
५१ गंगापूरी, रास्तेवाडा
वाई जिल्हा - सातारा
**<u>वाई- ४१२ ८०३</u>**

**विषय : -------------------------- पदासाठी अर्ज**
**( पदाचा स्पष्ट उल्लेख करावा )**

संदर्भ : ------------------------------

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी सरळसेवा प्रवेशाने --------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता खालीलप्रमाणे विहित नमुन्यात अर्ज सादर करीत आहे.

१. संपूर्ण नांव (आडनांव प्रथम लिहावे) ..........................................................................................................

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक [ ] ईमेल आयडी - ...................................................... .............

३. अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

०१.१२.२०१३ रोजी उमेदवाराचे वय

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

अर्जदाराची जन्मतारीख अक्षरी ..........................................................................................................

४. अर्जदार मागासवर्गीय आहे काय ? होय / नाही [ ]

अ) मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा [ ]

ब) अर्जदार ज्या प्रवर्गाकरीता अर्ज करीत आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. [ ]

क) अर्जदार उन्नत व प्रगत गटात मोडत आहे काय ? होय / नाही [ ]

( उमेदवार इमाव, विजाअ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक )

५. अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी (डोमीसाईल) आहे काय ? होय / नाही [ ]
( असल्यास रहिवासी दाखला सोबत जोडावा )

६. राष्ट्रीयत्व ............................................

७. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता -

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | शाळा / महाविद्यालय / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी | वर्ग / श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८. अनुभव असल्यास सविस्तर तपशिल खालील तक्त्यात नमूद करावा.

| अ.क्र. | काम केलेल्या संस्थेचे / कार्यालयाचे नांव | पद | कालावधी ( पासून ते पर्यंत ) | अनुभवाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केली आहे काय ?
असल्यास नोंदणी कार्यालयाचे नांव ............................................. नोंदणी क्रमांक ..................दिनांक .....................

१०. अर्जदार विवाहित आहे काय ? होय / नाही

विवाहित असल्यास हयात मुलांची संख्या

उमेदवाराची स्वाक्षरी

---

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपले विभागातील ( पदाचे नांव ) ............................... या संवर्गातील पदे भरणे संबंधित जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच मी असे प्रमाणित करतो/करते की, अर्जामध्ये दिलेली माहिती खरी आहे. त्या पृष्टयार्थ मी प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझी या पदासाठी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल. तसेच नोकरीवर हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. याबाबत निवड समिती / नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहिल व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही किंवा उपस्थित करणार नाही.

(उमेदवाराची स्वाक्षरी व संपूर्ण नांव )

---

**प्रमाणपत्र**

**नमुना अ**

**(नियम ४ पहा )**

मी, श्री. / श्रीमती / कुमारी .................................................................................................. ...................................................
श्री. ..........................................................................................यांचा / यांचा मुलगा / मुलगी / पत्नी वय ...............................वर्ष, राहणार ...................................................................................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१. मी .................................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ............................... (संख्या ) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.) जन्म दिनांक .............................

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराचे नांव...........................................